# नियंत्रक, वैध मापन शास्त्र, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय

शासकीय कुटीर क्र.७, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई – ४०० ०२१.

दुरध्वनी क्र. :- ०२२-२२०४३३५४/२२०४५७०६ फॅक्स क्र.०२२ – २२८८६६६६

Email Add :- dclmms@yahoo.in / dclmms complaints@yahoo.com

क्र.वैमाशा-१४/पडता.मुद्रां./२०१५/ ३१८२ दि. ०१ऑगस्ट, २०१५

प्रति,

सर्व उप नियंत्रक,
वैध मापन शास्त्र सर्व विभाग

विषय:- औद्योगिक आस्थापनांमध्ये अंतर्गत वापरासाठी असलेल्या वजन वा मापाच्या पडताळणी व मुद्रांकनाबाबत.

संदर्भ:- या कार्यालयाचे पत्र क्र.वैमाशा-१४/स्टँपिंग.व्हेरिफि.युन.एसईसी२४/२०१५/६३८ दि.२२/०१/२०१५.

या कार्यालयाच्या उपरोक्त संदर्भीय पत्राव्दारे वैध मापन शास्त्र अधिनियम, २००९ च्या कलम २४ मधील तरतुदीनुसार व्यापार उदिम व संरक्षणासाठी वापरात नसलेल्या वजन वा मापाची पडताळणी करण्यात येवू नये असे निर्देश देण्यात आले होते.

तथापी उद्योग विभाग महाराष्ट्र शासन यांचेकडून औद्योगिक आस्थापनांमधील अंतर्गत वापरासाठी असलेल्या वजन वा मापाची पडताळणी व मुद्रांकनाचा आग्रह धरुन संबंधीतांना त्रास दिला जात असल्याच्या तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. ही बाब कायद्यातील तरतुदींशी विसंगत असून ती अनुचीत आहे. सबब आपल्या अधिपत्याखालील सर्व क्षेत्रीय अधिका-यांना अंतर्गत वापरासाठी असलेल्या वजन वा मापाची पडताळणी व मुद्रांकन न करण्याबाबत निर्देश द्यावेत. तसेच याबाबतचा अनुपालन अहवाल त्वरीत या कार्यालयास सादर करावा.

(बा.कि.झावरे)
सहा.नियंत्रक, वैध मापन शास्त्र
नियंत्रक, वैध मापन शास्त्र,
महाराष्ट्र राज्य,मुंबई यांचेकरीता

प्रत माहितीसाठी:-

१. मा. प्रधान सचिव, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय
२. फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज
३. चेंबर ऑफ कॉमर्स
४. कॉन्फेडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्रीज
५. असोसिएटेड चेंबर्स ऑफ कॉमर्स ऑफ इंडिया